दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २९९ वा | शुक्रवार दि. २५ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## ज्येष्ठ अभिनेत्री सीमा देव यांचे निधन

**मुंबई ।** मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री सीमा देव यांचे आज निधन झाले आहे. सीमा देव गेल्या तीन वर्षांपासून अल्झायमर या आजाराने



त्रस्त होत्या. सीमा देव यांनी वांद्रे येथील राहत्या घरी आज सकाळी ७ वाजता अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनानं मराठी मनोरंजनसृष्टीवर शोककळा पसरली आहे. सीमा देव यांनी वयाच्या ८१ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला आहे. अनेक मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये सीमा यांनी काम केले. १९५६ मध्ये प्रदर्शित झालेल्या आलिया भोगासी या मराठी चित्रपटाद्वारे सीमा देव यांनी चित्रपटक्षेत्रात पदार्पण केले.

## न्यूज कॉलम

### शहर वाहतूक शाखेकडून थकित दंडाची वसुली!

**धुळे ।** वाहनांवरील थकलेली दंडाची रक्कम वसुल करण्यासाठी आज धुळे वाहतूक शाखेने धडक मोहिम राबविली. त्या अंतर्गत संतोषी माता चौकात वाहनं थांबवून तपासणी करण्यात आली. अवघ्या दोन तासातच तब्बल ४५ हजार रुपयांचा मागील दंड वसूल करण्याची कामगिरी वाहतूक शाखेने केली. या मोहिमेत एपीआय भूषण कोते यांचेसह असई जितेंद्र आखाडे, पोहकॉ भागवत पाटील, राजेंद्र पवार, पोना नरेंद्र पवार, विवेक वाघमोडे, आदी सहभागी झाले होते. वाहनांवरील दंडाची रक्कम तात्काळ भरण्याचे आवाहन पोलीस अधिकार्यांकडून करण्यात आले आहे.

### अंबापूर गावात गौण खनिजाची चोरी

**धुळे ।** साक्री तालुक्यातील अंबापूर शिवारात गौण खनिज मुरुमाची वाहतूक करणारे विना क्रमांकाचे ट्रॅक्टर महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अडवले. या वेळी चालक व अन्य एकाला ट्रॅक्टर साक्री तहसील कार्यालयात जमा करण्याची सूचना केल्यावर त्यांनी पळ काढला. तसेच महसूल कर्मचारी गोविंद जळबाजी ढोले यांच्या अंगावर ट्रॅक्टर चढवण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# कांदा निर्यात धोरणाविरुद्ध महाविकास आघाडीचा साक्रीत रास्ता रोको; केंद्र सरकारचा निषेध

**साक्री । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कांदा निर्यात धोरणा विरोधामध्ये महाविकास आघाडीचे तीनही पक्ष आक्रमक झाले. धुळे-सुरत महामार्गावरील शेवाळी फाटा या ठिकाणी या सर्व महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्याचबरोबर शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले.

केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर लावलेला ४० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्यात यावा; अशी मागणी या रास्ता रोको करणाऱ्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी व शेतकऱ्यांनी केली आहे. रस्ता रोको आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने शेतकरी देखील सहभागी झाल्याचे बघावयास मिळाले. यावेळी महाविकास आघाडीच्या तीनही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी भाजपचे केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या विरोधी असल्याचा आरोप देखील लावला आहे. केंद्र सरकारच्या कांदा निर्यात धोरण विरोधामध्ये यावेळी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी देखील करण्यात आली. आंदोलकांनी रास्ता अडवून धरल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी झाल्याचे बघावयास मिळाले. वाहनांच्या लांबच लांब रांगा देखील यावेळी लागल्याच्या बघावयास मिळाल्या आहेत.

कांदा पिकाच्या निर्यातीवर ४०% निर्यात शुल्क लावून केंद्र सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे आणि यातून शेतकऱ्यांचा असंतोष प्रकट होत असल्याचे दिसून येताच दोन लाख मेट्रिक टन कांदा सरकार मार्फत खरेदी केला जाणार असल्याचे आमिष दाखवले



### कांद्याचा पेच कायम

नाशिकमध्ये शेतकरी अधिक आक्रमक झाले होते. आज शेतकऱ्यांनी कांदा लिलाव बंद पाडून थेट मुंबई-आग्रा महामार्गावर रास्ता रोको केला. तब्बल दोन तासांपासून अधिक वेळ शेतकऱ्यांनी आंदोलन केले आहे. त्यामुळे वाहतुकीचा प्रचंड खोळंबा झाला. त्यामुळे केंद्रीय मंत्री डॉ. भारती पवार यांच्या मध्यस्थीनंतर व्यापाऱ्यांनी आंदोलन मागे घेतले असले तरी शेतकऱ्यांच्या आक्रमकतेमुळे कांदा लिलावाचा पेच अजूनही कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### कमी भाव मिळाल्याने संताप

लासलगाव बाजार समितीत कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक झाले होते. लिलावात १७०० ते १८०० रुपये भाव मिळत असल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. कांद्याचे लिलाव बंद पाडत, नाफेडने प्रत्यक्षात लिलाव करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली. यावेळी शेतकर्यांनी नाफेडच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. नाफेड आहे कुठे? असा सवालही शेतकऱ्यांनी यावेळी केला. दरम्यान, चांदवडमध्ये कांदा लिलाव बंद पाडल्यानंतर शेतकरी थेट मुंबई- आग्रा महामार्गावर आले. रास्ता रोको आंदोलन केले.

### सरकार गप्प का? रोहित पवार

दरम्यान, आजच्या शेतकऱ्यांच्या आंदोलनावरून राष्ट्रवादीचे आमदार रोहीत पवार यांनीही राज्य सरकारवर टीका केली आहे. रोहीत पवार म्हणाले, आज कांदा लिलाव सुरु झाले असता कांद्याचा दर केवळ २ हजार ते २१०० रुपये राहिला असून सरकारने केलेल्या घोषणेप्रमाणे २४१० दराने एकही व्यवहार झाला नाही, शिवाय नाफेडचे अधिकारी तर तिकडे फिरकलेही नाहीत. क्रेडिट घेण्यासाठी केंद्र सरकारच्या २ लाख टन खरेदीच्या जुन्याच निर्णयाला पुन्हा घोषित करून केंद्र सरकारचे भरभरून कौतुक करणारे राज्य सरकार आता गप्प का?

जात आहे,प्रत्यक्षात जवळपास ४० लाख टन कांदा आज रोजी शेतकरी बांधव आणि व्यापारी बांधवांकडे २० लाख टन कांदा पडून आहे. शेतकरी बांधवांची खरी मागणी आहे की ४०% निर्यातशुल्क रद्द करा म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारात कांद्याची निर्यात होईल आणि शेतकऱ्यांच्या कांद्याला किमान पाच हजार रुपयेच्या पुढे प्रती क्विंटलला भाव मिळू शकेल,म्हणून निर्यात शुल्क रद्द करावे ही प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी कार्याध्यक्ष, धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जितेंद्र मराठे, काँग्रेसचे धुळे जिल्हा अध्यक्ष शामकांत सनेर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे, महाराष्ट्र प्रदेश किसान काँग्रेस उपाध्यक्ष उत्तमराव देसले, माजी खासदार बापू चौरे, माजी आमदार डी.एस अहिरे, सभापती, प.स. शांताराम कुवर,मनीषा देसले, उपाध्यक्ष, अ.भा. किसान महासभा कॉ.सुभाष काकुस्ते,सचिन बेडसे, नरेंद्र तोरवणे, पंकज मराठे, भानुदास रामदास गांगुर्डे, दिनेश बोरसे, वाय. पी. कासार, सुनील नांद्रे, दिलीप ठाकरे,मन्साराम पवार,अशपाक कुरेशी, मनिष सोनवणे, संदीप भोसले, मुकेश शिंदे, सयाजीराव ठाकरे, गिरीश नेरकर, विलास गुलाबराव देसले, प्रकाश सोनू पाटील, किरण देवरे, दीपक साळुंके, सचिन सोनवणे, शामकांत भामरे, कपिल जाधव, सागर देसले, प्रज्योत देसले, किशोर पाटील, रविंद्र देसले, गोविंदराव देवरे, संभाजी सीताराम नांद्रे, कल्पेश सोनवणे, मनीष सोनवणे, सुनील बिलकुले आदी उपस्थित होते.

# राज्यातील सर्वच पोलीस स्टेशनमध्ये सायबर सेल सुरु करा

### मंत्री भुसेंचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

राज्यात ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या आर्थिक गुन्ह्यांचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले असून याला आळा घालण्यासाठी राज्यातील सर्वच पोलीस स्टेशनमध्ये सायबर सेल सुरु करा. अशी मागणी नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी एका निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हाटसअॅप, ऑनलाईन बँकींग, ऑनलाईन खरेदी, विविध कर्ज योजनांद्वारे नागरिकांची फसवणुक होत असते. यामध्ये ग्रामिण भागातील नागरिकांची संख्या ही मोठया प्रमाणावर आहे. सद्यस्थितीत प्रत्येक जिल्हास्तरावर सायबर सेल कार्यान्वित आहेत. या सेलमध्ये दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या विचारात घेता सायबर सेलमधील नियुक्त अधिकारी व कर्मचारींची संख्या पुरेशा प्रमाणात नाही. त्यामुळे फसवणुक केलेल्या गुन्हेगारांचा शोध व गुन्ह्यांच्या तपास कार्यात विलंब होतो. तपास योग्य दिशेने होत नसून आरोपी पकडले जात नाहीत. यामुळे गुन्हेगारांचे फोफावले असून या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी राज्यातील



प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सायबर सेल सुरु करण्यात यावा, अशी मागणी मंत्री भुसे यांनी पत्राद्वारे केली आहे. राज्यात मुंबई पोलीस धर्तीवर राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सायबर सेल कार्यान्वित करुन तेथील पोलीस ठाणे अंमलदार यांचेमार्फत विशिष्ट आर्थिक मर्यादेपर्यंत गुन्ह्यांची नोंद 'नॅशनल सायबर पोर्टलवर' केल्यास गुन्ह्यांचा तपास जलदगतीने होऊन आरोपींचा शोध लागेल व तक्रारदारास लवकरात लवकर न्याय मिळेल. तसेच जिल्हा सायबर सेलवरील येणारा अतिरिक्त ताण कमी होईल. म्हणुन राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत सायबर सेल सुरु करणे आवश्यक असल्याची मागणी पत्राद्वारे मंत्री भुसे यांनी केली आहे. सायबर गुन्ह्यांत माहितीची चोरी, ई-मेलच्या माध्यमातून अपशब्द पाठवणे, अवैध वापर, व्हायरस हल्ला, ठरवलेली सेवा देण्यास नकार असे अनेक प्रकार आहेत. त्याचबरोबर पोर्नोग्राफी, ट्रॅफिकिंग यासारखे काही गुन्हे हे संपूर्ण समाजाच्याच आरोग्यास हानी पोहोचवत असतात. यामुळे भविष्यात या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर पाऊले उचलण्याची गरज असल्याचे मंत्री भुसे यांनी म्हटले आहे.

# धुळ्यात चोरीचा प्रयत्न फसला

### शेजारच्यांनी घडवली चोरट्यांना अद्दल

**धुळे । प्रतिनिधी**

देवपूरातील नकाणे रोडवरील श्रीनाथ नगरात चोरट्यांनी एका बंद घरावर निशाणा साधला. मात्र, जागरूक शेजार्यांना चाहुल लागताच त्यांनी आजूबाजूच्या लोकांना एकत्र करत चोरट्यांवर झडप घातली. यावेळी चोरट्यांची चांगलीच धुलाई करण्यात आली. मात्र, अंधाराचा फायदा घेवून चोरटे पसार झालेत. सकाळी परिसरातच टाईल्सचे काम करणार्या कारागीरांना सोन्याने भरलेले पाऊच मिळून आले. इमानदार कारागिरांनी सोने घरमालकांकडे दिले. त्यांनीही इमानदारीचे दर्शन घडवत १५ तोळे सोन्याचे दागिने पोलिसांकडे सुपूर्द केले.

सेवानिवृत्त प्र. जिल्हा मार्केटिंग अधिकारी कोमलसिंह भिमसिंह सिसोदीया हे श्रीनाथ नगरात, प्लॉट नं. ५३ मध्ये राहतात. घरी कानुमातेचा कार्यक्रम असल्याने त्यांची मुलगी दिपश्रीही त्यांच्याकडे आलेली आहे. काल सायंकाळी घराला कुलूप लावून ते सर्वजण बाजारासाठी घराबाहेर पडले होते. तेथूनच ते जेवणासाठी बाहेर गेलेत. दरम्यान, घराला कुलूप लावलेले दिसताच चोरट्यांनी डाव साधला. कोमलसिंह सिसोदीया यांच्या घरासमोर किरण पाटील राहतात. त्यांच्या १७ वर्षीय मुलीने खिडकीतून रात्री ८ वाजेच्या सुमारास दुचाकीवर तीन जण आलेले बघितले. ते तिला संशयास्पद वाटले. त्यापैकी दोघांनी कंपाऊंडमध्ये उड्या घेतल्यात. तर एक जण बाहेर उभा होता. याबद्दल तिने वडिलांना सांगितले. लागलीच त्यांनीही



आपले बंधू आणि वंदे मातरम प्रतिष्ठानचे सक्रीय सदस्य जितेंद्र पाटील यांना फोन करुन कळविले. त्यांच्याही घराचे काम नजीकच सुरु होते. ते आपला मुलगा यश याला घेवून तिथे पोहोचले. तसेच परिसरातील रिटायर्ड पीएसआय विजय पाटील हे देखील काठ्यालाठ्या घेवून आलेत. किरण पाटील यांचे बंधू जितेंद्र पाटील यांच्या बंगल्याचे काम सुरु आहे. त्याठिकाणी फरशा उचलत असताना ग्रेनाईट पॉलिश काम करणारे संजय वर्मा (रा. उत्तरप्रदेश, ह.मु. सर्वेश्वर नगर, वाडीभोकर रोड, धुळे) या तरूणाला एक पाऊच आढळले. त्यांनी ते ग्रेनाईट कारागीर राजकुमार चौधरी (रा. राजस्थान, ह.मु. रुपामाई शाळेजवळ, देवूपर, धुळे) यांना दाखविले. पाकिटात सोने आढळून आल्याने दोघांनी इमानदारी दाखवित घरमालक जितेंद्र पाटील यांच्याकडे पाऊच सुपूर्द केले. जितेंद्र पाटील यांना सर्व प्रकार लक्षात आला. रात्री ज्या चोरट्याला झोडपले तो त्याच ठिकाणी कोसळला होता. त्याच्याच हातातून ते पाऊच निसटल्याचे त्यांच्या लक्षात आले. तितक्यातच त्याठिकाणी एलसीबीचे संदीप सरग, संदीप पाटील आदी दाखल झाले.

# गावठी दारु निर्मितीचा अड्डा उद्ध्वस्त



**पिपळनेर । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यात पिंपळनेर पोलिसांची शेलबारी गावातील नाल्यात सुरू असलेल्या हातभट्टी दारू निर्मितीच्या अड्डयावर छापा टाकत कारवाई केली. तेथून सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त करीत जागीच नाश करण्यात आला.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे काल दि.२४ रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. नाल्यामध्ये देवराम शिवराम माळी (वय ४५ रा.शेलबारी ता. साक्री) हा अवैधरित्या गावठी हातभट्टीची दारू तयार करण्यासाठीचे कच्चा रसायनाचा साठा तसेच साधनसामग्रीसह गावठी हातभट्टीची दारू गाळतांना मिळून आला. घटनास्थळी ५० लिटर मापाचे ४२ प्लास्टिकचे बॅरल त्यात प्रत्येक बॅरलमध्ये अंदाजे ४० लिटर कच्चे रसायन तसेच २ हजारांचा २० लिटर गावठी दारूने भरलेला एक स्टीलचा हंडा असा एकुण १ लाख ३० हजार १०० रूपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. तो जागीच नष्ट करण्यात आला. याप्रकरणी देवराम माळीविरोधात पिंपळनेर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई)(फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सपोनि श्रीकृष्ण पारधी, पोसई बी.एम.मालचे, अमित माळी, भुषण शेवाळे, पोना सुर्यवंशी, हजारे, पोकाँ बोरसे सोमनाथ पाटील, कोळी, सैदाणे, धनगर यांच्या पथकाने केली.

# मनमाड – पंढरपूर रेल्वेगाडी सुरू करा


### मंत्री दादाजी भुसेंचे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्र्यांना पत्र

### उत्तर महाराष्ट्रातील भाविकांची परवड थांबणार

**नाशिक । प्रतिनिधी**

उत्तर महाराष्ट्रातील भाविकांसाठी मनमाड ते पंढरपुर रेल्वे गाडी सुरु करण्याबाबत नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांना पत्र पाठवून ही रेल्वेगाडी सुरू करण्यासाठी विनंती केली आहे. ही रेल्वेगाडी सुरू झाल्यास जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रातील भाविकांना मोठा दिलासा मिळणार असून परवड थांबणार आहे.

पंढरपुर येथील श्री विठ्ठल मंदिर हे महाराष्ट्रातील वारकऱ्यांचे श्रद्धास्थान आहे. पंढरपुराला मराठी संस्कृती घडविणाऱ्या थोर भागवतधर्मीय संतांनी नावारूपास आणलेले महाराष्ट्राचे पवित्र तीर्थक्षेत्र असून मनमाडमार्गे उत्तर महाराष्ट्रसह परिसरातील येवला, नांदगांव, मालेगांव, सटाणा, देवळा, साक्री, धुळे, चाळीसगांव, पिंपळनेर, चांदवड तालुक्यातील भाविक मोठया संख्यने पंढरपुर



येथे जात असतात. या भागातील भाविकांना पंढरपुर येथे जाण्यासाठी थेट कुठलीही रेल्वेगाडी नाही. यामुळे भाविकांसाठी ही गाडी अत्यंत गरजेची असून तत्काळ रेल्वेगाडी सुरू करण्याची पत्राद्वारे मागणी केली आहे.

या रेल्वेगाडीमुळे पंढरपुर येथे जाण्यासाठी भाविकांना मनमाडहुन सायंकाळी निघून सकाळी पंढरपुर येथे पोहचेल अशा प्रकारची पॅसेंजर रेल्वेसेवा दररोज सुरु केल्यास सदर भागातील भाविकांची व वारकरी उपासकांची जाण्या-येण्याची सोय होईल. तरी प्रवाशांच्या सोईसाठी मनमाड ते पंढरपुर रेल्वे सेवा सुरु करण्यात यावी अशी मागणी काल रोजी नाशिकचे पालकमंत्री भुसे यांनी केली आहे.

# धुळेकरांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करु : आयुक्त पाटील

**धुळे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या नवनियुक्त आयुक्त अमिता दगडे पाटील यांनी पदभार घेतल्यानंतर त्यांच्या उपस्थितीत पहिलीच स्थायी समितीची सभा झाली. यावेळी त्यांचा सत्कार करतानाच सदस्यांनी सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. आमचे तीन-चारच महिने राहीलेत, त्यामुळे विकासकामांना चालना देण्यासाठी सहकार्य करावे, अशी अपेक्षा सभापतींसह सदस्यांनी व्यक्त केली. त्यावर आयुक्तांनीही, धुळेकरांच्या अपेक्षा आपण पुर्ण करण्याचा प्रयत्न करु, असे आश्वासीत केले.

दरम्यान, भारताची चांद्रयान-३ मोहिम यशस्वी झाल्याबद्दल इस्त्रोच्या शास्त्रज्ञांचे कौतुक करत त्यांच्या



अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला. या सभेला आयुक्त अमिता दगडे पाटील, नगरसचिव मनोज वाघ, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त विजय सनेर, संगिता नांदुरकर तसेच सदस्य सुनिल बैसाणे, हर्षकुमार रेलन, किरण अहिरराव, वसीम बारी, फातेमा अन्सारी, नाजियाबानो पठाण आदी सदस्यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सभेच्या अजेंड्यावर एकूण चार विषय चर्चे साठी ठेवण्यात आले होते. सभेच्या सुरवातीला नवनियुक्त आयुक्त अमिता दगडे पाटील, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता नवनीत सोनवणे यांचे स्वागत करुन सत्कार करण्यात आला. यावेळी आयुक्त अमिता पाटील यांनी, शासनाने मला धुळेकरांची सेवा करण्याची संधी दिली, याबद्दल शासनाचे व धुळेकरांचे आभार मानले. तसेच येणार्या काळात महापालिकेची दोन्ही चाके बरोबरीने चालविण्याचा प्रयत्न करु, धुळेकरांच्या अपेक्षा पुर्ण करण्याचा प्रयत्न करु, असेही त्या म्हणाल्या. तर सभापती किरण कुलेवार यांनी, महापालिकेत खर्या अर्थाने महिलाराज येण्यासाठी आयुक्तपदी महिलेची गरज होती. त्यावर दोन महिन्यांपुर्वीच आमची चर्चाही झाली होती, असे म्हणत त्यांनी आयुक्तांचे स्वागत केले. तसेच सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

सभेत सुनिल बैसाणे यांनी पुन्हा महापालिकेतील इंधन घोटाळ्याचा मुद्दा नूतन आयुक्तांसमोर उपस्थित केला. तसेच याबाबत आपल्या स्तरावर चौकशी करावी, अशी मागणी केली. आम्ही केवळ इंधन खरेदीच्या पावत्यांवरुन नोंदी ठेवण्याचे काम करतो. इंधन खरेदी ही आरोग्य विभाग व अग्निशामक विभागाकडून झालेली आहे. त्यात तफावत आढळून आल्याचेही त्यांनी नमूद केले. शिवाय इंधन भ्रष्टाचाराबाबत यापुर्वी हरिश्चंद्र लोंढे व नागसेन बोरसे यांच्याकडूनही तक्रारी प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. यावर सुनिल बैसाणे यांनी, पंप चालकाने मॅन्युअल पावत्या का दिल्या? याबाबत पंपचालकाला विचारणा करावी, अशी मागणी करतानाच यात संगनमत असल्याची शंकाही उपस्थित केली. तसेच करोना काळात सर्व बंद असताना सुमारे ८९ लाख रुपयांची इंधन खरेदी झालीच कशी? असा सवाल उपस्थित केला. तसेच आतापर्यंत सदस्यांनीच प्रशासनाचे भ्रष्टाचार उघडकीस आणले आहेत, असे सांगत प्रशासनाचा भोंगळ कारभार सुरु असल्याचे नूतन आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले.

# सिडकोत सलग तिसऱ्या गुरुवारी तिसरी हत्या

**नाशिक । प्रतिनिधी**

गेल्या सलग दोन गुरुवार नंतर कालच्या गुरुवारीही आता तिसरी हत्या सिडको परिसरात घडल्याने गुरुवारचे हे हत्याकांड थांबण्यास काही तयार होत नसल्याचे चित्र निर्माण झाले असल्याचे दिसून येत आहे. यावर पोलिसांनी योग्य ती कारवाई करून गुंडांची नांगी ठेचावी, त्यांची दहशत थांबवावी अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

याबाबत माहिती अशी की, नाशिक शहर परिसरात गुन्हेगारी प्रचंड वाढली असून पोलिसांचा वचकच कमी झाला आहे. शहरातील सिडको परिसरात गुरुवारी भरदिवसा एका भाजी विक्रेत्याची हत्या करण्यात आली आहे. तब्बल ६ ते ७ हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी हा हल्ला केला असल्याने परिसरात प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी नाशिक पोलिसांनी कठोर कारवाई करून गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी कंबर कसली अशी मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हत्या झालेल्या भाजी विक्रेत्याचे नाव संदीप आठवले (वय २२) असे असून जुन्या सिडकोतील लेखानगर येथील शॉपिंग सेंटर चौकात हे हत्याकांड घडले आहे.

## संरक्षण मिळाले; पण भीती कायम

डेटा संरक्षण विधेयकामुळे केंद्र सरकारला अनेक अधिकार मिळाले आहेत. त्यामुळे सरकार राष्ट्रीय सुरक्षेला महत्त्व देणे, आंतरराष्ट्रीय संबंध जपणे, सुव्यवस्था राखणे यांसारख्या बाबींमध्ये डेटा सुरक्षिततेचे नियम पाळण्यास बांधील राहणार नाही. नागरिकांच्या खासगी माहितीचाही दुरुपयोग होण्याची भीती विरोधकांसह सामान्य नागरिकांना वाटत आहे. विधेयक मंजूर झाले तरी अशा काही प्रश्नांची उत्तरे मिळणे बाकी आहे.

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये डेटा संरक्षण विधेयक मंजूर करून घेण्यात सरकारला यश आले आहे. लोकसभेत सरकारकडे बहुमत होतेच; परंतु राज्यसभेतही बिजू जनता दल, वायएसआर काँग्रेस आदी पक्षांच्या मदतीने सरकारला हे विधेयक मंजूर करून घेता आले. या पार्श्वभूमीवर डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण विधेयकात कोणत्या तरतुदी आहेत, त्यातल्या जनसामान्यविरोधी किती आणि संदिग्ध किती, त्याला विरोध का होतोय, आक्षेपांवर सरकारचे काय म्हणणे आहे आदी प्रश्न चर्चेत आले. या विधेयकात एका पद्धतीने डिजिटल वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्याची तरतूद आहे.

केंद्र सरकारने गेल्या वर्षी विविध व्यक्ती आणि संस्थांचा अभिप्राय लक्षात घेऊन डेटा संरक्षणाचे विधेयक मागे घेतले होते. त्यानंतर, १८ नोव्हेंबर २०२२ रोजी सरकारने डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण विधेयक नावाचा नवीन मसुदा प्रकाशित केला आणि या मसुद्यावर सल्लामसलत केली. याला सार्वजनिक क्षेत्रातील संस्था, संघटना आणि उद्योग संस्था आणि भारत सरकारच्या ३८ मंत्रालये किंवा विभागांकडून सूचना आणि टिप्पण्या मिळाल्या. त्यांचा विचार करून नवीन मसुदा असलेला डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन (डीपीडीपी) विधेयक मंजूर करण्यात आले. हा कायदा लागू झाल्यानंतर, लोकांना त्यांच्या डेटाचे संकलन, स्टोअरेज आणि त्याच्या प्रक्रियेबद्दल तपशील विचारण्याचा अधिकार मिळेल. यामध्ये वादाच्या परिस्थितीबाबतही तरतूद करण्यात आली आहे. विवाद असल्यास डेटा संरक्षण मंडळ निर्णय घेईल. दिवाणी न्यायालयात जाऊन नुकसानभरपाईचा दावा करण्याचा अधिकार नागरिकांना असेल. मसुद्यात ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारच्या डेटाचा समावेश आहे, तो नंतर डिजिटल करण्यात आला आहे. कायदेशीर किंवा व्यावसायिक कारणांसाठी आवश्यक असल्याशिवाय वापरकर्त्यांचा डेटा राखून ठेवू नये, असे विधेयकात नमूद करण्यात आले आहे. नवीन पर्सनल डेटा प्रोटेक्शन बिल बायोमेट्रिक डेटाच्या मालकाला पूर्ण अधिकार देते. एखाद्याला उपस्थितीच्या उद्देशाने कर्मचाऱ्याचा बायोमेट्रिक डेटा आवश्यक असला तरी त्याला संबंधित कर्मचाऱ्याची स्पष्ट संमती आवश्यक असेल. नवीन डेटा संरक्षण विधेयक 'सोशल मीडिया' कंपन्यांवर लगाम घालण्यास आणि त्यांची मनमानी कमी करण्यास मदत करेल. सरकारी यंत्रणांना राष्ट्रीय सुरक्षा कायदा आणि सुव्यवस्थेच्या आधारावर डेटा वापरण्यासाठी विशेष परवानगी मिळेल. या अंतर्गत सरकार राष्ट्रीय सुरक्षा, आंतरराष्ट्रीय संबंध, सुव्यवस्था राखणे यांसारख्या बाबींमध्ये डेटा सुरक्षिततेचे नियम पाळण्यास बांधील राहणार नाही आणि लोकांची वैयक्तिक माहिती वापरण्यास सक्षम असेल. त्यामुळे नागरिकांच्या खासगी माहितीचा दुरुपयोग केला जाईल, अशी भीती विरोधकांसह सामान्य नागरिकांना होती. सरकारने त्याचे समाधानकारक उत्तर न देता विधेयक मंजूर करून घेतल्याचा आरोप होत आहे. या विधेयकात म्हटले आहे की, ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर डेटा सुरक्षेशी संबंधित प्रकरणात दोनदा शिक्षा झाल्यास सरकार संबंधितांवर भारतात बंदी घालण्याचा विचार करू शकते. डेटा सुरक्षा उल्लंघनाच्या प्रकरणांमध्ये जास्तीत जास्त २.५ अब्ज रुपयांच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. ऑनलाइन डेटा सुरक्षा माहितीचा अधिकार कमी केल्याबद्दल या विधेयकावर टीका करण्यात आली; परंतु त्याचेही समाधानकारक उत्तर सरकारने दिले नाही. विरोधकांनीही हा मुद्दा व्यवस्थित लावून धरला नाही. तज्ज्ञांना वाटते की, या विधेयकामुळे भारतात आधीच अस्तित्वात असलेली ऑनलाइन सेन्सॉरशिप आणखी वाढेल. परिणामी, संसदेचे अधिवेशन संपताच हा चर्चेचा विषय ठरला.

# अंतराळात भारताने घडविला इतिहास

**'चांदोबा चांदोबा भागलास का निंबोणीच्या झाडामागे लपलास का निंबोणीचं झाड करवंदी मामाचा वाडा चिरेबंदी'**

हे ग. दि. माडगूळकर यांचे गाणे आजही आबालवृद्धांच्या ओठावर ऐकायला येते. आज या चंद्रमाचे अनोखे दर्शन देशवासीयांना झाले. ४० दिवसांचा चांद्रयान-३ चा यशस्वी प्रवास चंद्रावर थांबला आणि भारत मातेच्या पुत्रांनी आज चंद्राला आपलेसे केल्याने भारताने इतिहास रचला. देशभर जल्लोष साजरा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर असतानाही व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी होऊन वैज्ञानिकांचे अभिनंदन केले. 'हा क्षण भारताच्या ताकदीचा आहे. हा भारतातील नव्या ऊर्जेचा, नव्या विश्वासाचा, नव्या चेतनेचा क्षण आहे. अमृत काळात अमृताचा वर्षाव झाला. आपण पृथ्वीवर एक प्रतिज्ञा घेतली आणि ती चंद्रावर साकार केली. अंतराळात नव्या भारताच्या नव्या उड्डाणाचे आपण साक्षीदार आहोत,' असे मोदी म्हणाले. चंद्राच्या कोणत्याही भागात यान उतरवणारा आपला भारत देश हा चौथा देश मानला जातो. यापूर्वी केवळ अमेरिका, सोव्हिएत युनियन आणि चीनने हे यश मिळवले आहे. मात्र, चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरवणारा भारत पहिला देश ठरला आहे.

चांद्रयान-३ हे चांद्रयान-२ चे फॉलो-ऑन मिशन म्हणजे पुढील टप्पा होता. चांद्रयान-३ मध्ये लँडर आणि रोव्हर पाठवण्यात आला होता. चांद्रयान-३ हे चंद्राच्या पृष्ठभागावर सुरक्षित लँडिंग करेल. त्यानंतर विक्रम लँडरमधील रोव्हर तेथील पाण्याचे साठे शोधणे आणि चंद्रावरील माती, दगड यांचे नमुने आणि इतर आवश्यक माहिती गोळा करेल. त्यासाठी चांद्रयानच्या लँडरचे नाव विक्रम आणि रोव्हरचे नाव प्रज्ञान ठेवण्यात आले होते. भारतासाठी अत्यंत अभिमानाचा, स्वाभिमानाचा आणि गौरवाची असलेली चांद्रयान-३ मोहीम यशस्वी झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी आता सूर्य आणि शुक्र ग्रहाबाबत विशेष मोहीम आखण्याचा संकल्प करा, असा ऊर्जावान संदेश भारतीय शास्त्रज्ञांना दिला आहे. २०१९मधील



चांद्रयान-२ चा अनुभव लक्षात घेऊन इस्रोने चांद्रयान-३ साठी संपूर्ण काळजी घेतली. विक्रम लँडरच्या मागे-पुढे आणि वरील बाजूस अँटेना जोडण्यात आलीत. त्यामुळे लँडर मॉड्युलच्या स्थितीच्या प्रत्येक ससत काळजी घेतली होती. या आधीही अंतराळ क्षेत्रात भारताने भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने ३० जुलै रोजी एकाच वेळी ७ उपग्रहांचे प्रक्षेपण केले होते. यामध्ये एक स्वदेशी आणि सिंगापूरच्या सहा उपग्रहांचा समावेश आहे.


हे उपग्रह आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथून PSLV-C५६ रॉकेटद्वारे प्रक्षेपित करण्यात आले होते. सिंगापूरने पृथ्वीचे निरीक्षण करणारे उपग्रह अंतराळात पाठवण्यासाठी इस्रोची मदत घेतली. त्यासाठी इस्रोच्या PSLV-C ५६ रॉकेटद्वारे सिंगापूरच्या ऊड-ड-ठ आणि इतर ६ उपग्रहांचे प्रक्षेपण करण्यात आले आहे. या सर्व उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण झाले. चांद्रयान-३ चे यशस्वी प्रक्षेपण करत असताना इस्रोची ही आणखी एक यशस्वी कामगिरी आहे. पृथ्वीच्या बाहेर चंद्र हा एकमेव खगोलीय पिंड आहे जिथे मानव पोहोचला आहे. आतापर्यंत १०० हून अधिक अंतराळयान चंद्रावर पाठवण्यात आले आहेत. त्यापैकी २४ मानव चंद्रावर उतरले आहेत, त्यापैकी १२ लोक त्याच्या पृष्ठभागावरदेखील चालले आहेत. पृथ्वीवरील प्रयोगांसाठी चंद्रावरून आतापर्यंत ३८२ किलो माती आणि दगड आणण्यात आले आहेत.

चांद्रयान-१ या आपल्या पहिल्या अंतराळातल्या दूरवरच्या चंद्र मोहिमेचे अंतर्गत इस्रोने ऑक्टोबर २००८ मध्ये मूल्यमापन करताना जी निरीक्षणे नोंदवली आहेत, त्याप्रमाणे, चंद्राच्या पृथ्वीपासून जवळच्या आणि अत्यंत दूरच्या अशा दोन्ही बाजूंचे त्रिमितीय नकाशे तयार करणे आणि चंद्राच्या संपूर्ण पृष्ठभागावरच्या रासायनिक तसेच खनिज उपलब्धतेचे नेमके नकाशा रेखाटन करणे हे प्राथमिक उद्दिष्ट होते. चंद्राच्या पृष्ठभागावर पाणी आणि हायड्रॉक्सिलचे अस्तित्व असल्याचे मिळालेले पुरावे हा चंद्रयान-१ या मोहिमेअंतर्गत लावलेला मोठा शोध आहे. तिथल्या ध्रुविय क्षेत्रात पाणी आणि हायड्रॉक्सिल विपुल प्रमाणात असल्याची माहितीही या शोधासंदर्भातल्या माहिती साठ्यातून समोर आली आहे. पाण्याचे अस्तित्व असल्याच्या पुराव्यांच्या शोधाशिवाय, इस्रोने चंद्राच्या पृष्ठभागावर टिटॅनिअम, कॅल्शिअम, ल्युमिनिअम आणि मॅग्नेशिअमसारखी खनिजे असल्याचाही शोध लावला असून त्याचेही पुरावे मिळवले.

एखाद्या सामान्य व्यक्तीला यात विशेष असे काही जाणवणार नसले तरी, जगभरातील शास्त्रज्ञांचे लक्ष इस्रोच्या संशोधनाकडे लागले आहे. सामान्य माणसांसाठी चंद्रयानाचा ऑर्बिटर उपग्रह म्हणजे मोहीम नाही, असे वाटते असले तरी इस्रोच्या शास्त्रज्ञांसाठी हा ऑर्बिटर म्हणजे अशी एक मोहीम पार पाडण्यासाठी तयार केलेली कृत्रिम तांत्रिक वस्तू आहे, जी चंद्राच्या पृष्ठभागावर पाणी आणि खनिजांचे अस्तित्व शोधण्यासाठीची मोहीम पार पाडण्यासाठी तयार करण्यात आली. चंद्राची भौगोलिक स्थिती, चंद्राच्या पृष्ठभागावरच्या खनिजांची उपलब्धता याविषयी समजून घेणे हा चंद्रयान-१ या मोहिमेचे प्राथमिक उद्दिष्ट होते. आता आपल्या शास्त्रज्ञांनी चांद्रयान-३ ची मोहीम यशस्वी केली आहे. सूर्य चंद्राला दैवत्व देऊन त्याची पूजा करणाऱ्या भारताने आता वैज्ञानिक प्रगतीतून जगाला हेवा वाटेल अशी कामगिरी केली आहे.

# नम्रतेची मूर्ती : राजयोगिनी दादी प्रकाशमणिजी

**आज २५ ऑगस्ट प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या माजी आंतरराष्ट्रीय मुख्य प्रशासिका (१९६९ ते २००७) डॉ. दादी प्रकाशमणीजी यांची १६ वी पुण्यतिथी जागतिक बंधुता दिवस म्हणून साजरी करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवन कार्याविषयी घेतलेला मागोवा.**




दादी प्रकाशमणिजींचे बालपणीचे नाव रमा होते. त्यांचे वडील ज्योतिषी होते. ते त्यांना 'मीरा' नावाने संबोधत असत. लहान असतानाच त्या 'ओम मंडळी' कडे आकर्षित झाल्या आणि दहावीची परिक्षा दिल्यावर यज्ञ सेवेमध्ये सक्रीय झाल्या. त्यांच्या बहिणी व इतर परिवारातील इतर सदस्यही त्यात समर्पित झाले. ब्रह्माबाबा प्रेमाने त्यांना 'कुमारका' असे संबोधत. डिसेंबर १९६८ मध्ये जेव्हा त्या काही भावा - बहिणींचा ग्रुप घेऊन मधुबनला आल्या होत्या तेव्हा बाबांनी त्यांना तेथेच थांबवून घेतले आणि काही दिवसांतच अनेक युक्त्या वापरून संस्थेच्या कामकाजाविषयी संपूर्ण ओळख करून दिली. एक दिवस बाबांनी गप्पा-गोष्टी करता-करता त्यांना असे विचारले की बेटा, जर बाबा अलिप्त झाले तर तू कामकाज सांभाळू शकशील का? बाबांना दादीजींनी मोठ्या दिमाखात उत्तर दिले हो बाबा, का नाही. नंतर त्यांना अशी जाणीव झाली की बाबांनी ही गोष्ट खूपच गांभिर्याने विचारली होती. यज्ञाचे सर्व करण्यासाठी तर सेवेत निमित्त आणि निर्माण भाव दादीमध्ये स्नेह आणि शक्तीचे अद्भुत संतुलन होते. सर्वांमधील विशेषता ओळखून त्यांचा सेवेस उपयोग करणे, सर्वांना स्नेह आणि सन्मान देणे, कोणाच्याच कमतरता मनात न ठेवता त्यांना आईसारखा स्नेह देऊन प्रगती पथावर नेणे इत्यादी गुण दादींमध्ये होते. त्यामुळे सर्वजण एका सुत्रात गुंफले गेले होते. जसे दादींकडून सर्वांनाच मनापासून स्नेह व सन्मान मिळायचा तसाच सर्वच जण मनापासून त्यांचा मान सन्मान ठेवत. 'मी' या शब्दाचा उपयोग त्यांच्याकडून नाममात्र वापरला गेला असेल. त्या नेहमीच 'निमित्त आणि निर्माण' भावनेची सेवा करत. कितीही मोठी जबाबदारी असली तरी, त्या नेहमी म्हणत-बाबा जबाबदारी घेण्यास आहेत. अशा निश्चयामुळे त्या सदा निश्चिंत रहात, जेव्हा त्या एखाद्या इमारतीचे भूमिपूजन करत तेव्हाच त्यांच्या संपूर्णतेची वेळ निश्चित करत. त्यांच्या या समजदारीमुळेच ज्ञानसरोवर आणि शांतीवनची निर्मिती ठरवलेल्या कालावधीत पूर्ण झाली होती. दादीजी सर्वबहिणींना आपल्या सख्या मानत आणि सगळ्याजणी आपल्याही पेक्षा जास्त प्रगती करोत, हीच त्यांची शुभकामना होती. त्या स्वच्छता प्रिय होत्या, मातांकरता त्यांना विशेष स्नेह होता, त्यांची प्रगती व्हावी म्हणून त्या काही विशेष कार्यक्रमांचे आयोजन करत असत. दादी दिवसातून ४ वेळा मुरली वाचन करत असत, विशेषत्वाने रात्री झोपण्यापूर्वी निश्चितच वाचत. यज्ञाचे कार्य त्या अतिशय काटकसरीने करत. कोणताही कार्यक्रम अगदी साधारणही नसावा किंवा फार भपकेबाजही नसावा परंतू त्यातील सुवर्णमध्य त्या नेहमी काढत. त्या स्वच्छता प्रिय होत्या जसेच नम्रतेची देवता होत्या. मोठ-मोठ्या साधू-संतांना, मंत्र्यांना, पंतप्रधानांना व राष्ट्रपतींना भेटताना त्या हात जोडून अभिवादन करत. त्यांचे म्हणणे होते की इतक्या मोठ्या संस्थेची प्रमुख (हेड) स्वतःला समजणे म्हणजे 'हेडेक' (डोकेदुखी) करून घेणे आहे. म्हणूनच त्या स्वतःला नेहमी सेवाधारी समजत व सहज रहात होत्या. नेहमीच उमंग-उत्साहात राहणे व इतरांनाही उमंग-उत्साह देणे हा त्यांचा नॅचरल संस्कार होता. कोणत्याही गोष्टीचा निर्णय निमिषात घेण्याइतकी त्यांची बुद्धि दिव्य आणि निर्मळ होती. आपल्या याच गुणांमुळे व विशेषतांमुळे, जवळपास ३७ वर्षे त्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या मुख्य प्रशासिका होत्या, त्यांच्या सेवा काळात संस्थेचा प्रचार-प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. ज्याचे फलित म्हणून विश्वातील जवळपास १४० देशांमध्ये हजारों ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्र आहेत व लाखो बंधू-भगिनी सेवा करत आहेत. जगातील सर्वांत मोठी महिला एनजीओ म्हणून संस्था ओळखली जाते. विश्वात मानवतेची सेवा करण्यासाठी, शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करण्यासाठी संस्थेला यूएन कडून अनेक सन्मान व पुरस्कार मिळाले आहेत.

आज २५ ऑगस्ट प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या माजी आंतरराष्ट्रीय मुख्य प्रशासिका (१९६९ ते २००७) डॉ. दादी प्रकाशमणीजी यांची १६ वी पुण्यतिथी जागतिक बंधुता दिवस म्हणून साजरी करण्यात येत आहे.स्व.दादी प्रकाशमणीजी यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

**राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी,**
मुख्य संचलिका, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, नाशिक

## शब्दकोडे-१५९



आडवे शब्द

२. वार्ताहर ६. शीण ९. गाय १०. मोफत ११. जोरात भांडण १३. नाराजी १५. उकळी, उमाळा १७. गुप्तचर, जासूस १८. अचेतन १९. गाणे २१. नांगर २२. जबाबदारी २३. अडथळा, पाचर २४. भंगुर २५. शांतता २७. रमलेला, एकरूप २८. पारंगत ३१. टिकाऊ ३२. रस्ता ३३. आपल्या देशाची राजधानी ३४. कावीळ ३७. हाणामारी ४०. असंमती ४२. त्रास, मेहनत ४४. प्रशंसा ४६. शरीरातून आरपार जाणारे किरण ४७. पायऱ्या असलेली विहिर ४८. धाक ५०. विस्तव ५२. डाळीचे कालवण ५३. महिला ५४. अभिमान ५६. विद्ध ५७. महादेव ५८. मर्यादा ५९. जावई ६१. रामजन्माक्षी तिथी ६३. प्रदेश, परिसर ६५. आश्रय ६७. लोभ ६८. संताप ७१. अनुमान, कल्पना ७२. पेच ७३. ढग ७५. ढीग ७७. लोकसंख्या मोजणे ७९. ठाऊक ८०. शैली ८१. थोडे ८२. प्रथा ८३. शरीर, उपजत कौशल्य ८४. किंचित ८५. पश्चिम दिशा, सूर्य मावळतो ते स्थान

उभे शब्द

१. सहजी आकलन न होणारे २. लहानपण ३. लवण ४. कोरडे, रूक्ष ५. नागाची एक जात ७. दया यावी असे ८. गंध, परिमळ १०अ. ठोंब्या, निर्बुद्ध १२. गीते लिहिणारा १४. सरस्वती, शारदा १६. प्रिय स्त्री २०. होडी २२. अरण्य २६. रमलेला २७. पुराणातील घोडागाडी २८. गर्क २९. नोकरी नसलेला ३०. बस्तान ३१. आवाजी गोंधळ ३२. परीक्षा घेणारा ३५. लज्जास्पद ३६. एक मापी परिमाण ३८. राज्यसुख ३९. शेवटच्या प्रस्थानापूर्वी केलेली आवराआवर ४१. कारखान्याचा मालक चालक ४३. दया ४५. खात्री ४९. अचूक (प्रत्युत्तर) ५१. नौदल ५४. झेंडा ५५. मोलकरीण ५९. जगातील, जगाच्या संदर्भातील ६०. त्यानुसार ६१. पती ६२. कृष्णभक्त कवयित्री ६४. कृष्णाची दुष्ट मावशी ६६. श्रीराम ६९. गोंगाट ७०. समजायला सेपे ७४. गाव ७६. अखंड ७८. समाविष्ट ७९. पूर्वग्रह, प्रतिकूल ग्रह ८१. खाल्ल्यास पड

### शब्दकोडे १५८ चे उत्तर

**आडवे उत्तर** - १.प्रगती ४.शिकरण ७.गगन १०.प्रणय ११.अनल १३.डास १५.वसन १७.पाव १८.गावसकर २०.नानकटाई २४.बडवा २७.कमजोर ३१.तराजू ३४.इडली ३६.दबाव ३७.पारख ३९.नतमस्तक ४०.सन ४१.काशी ४३.वाडगा ४५.डेरा ४८.रस ५०.तजवीज ५३.जास्त ५५.द्रव्यहीन ५८.टग्या ५९.रज ६०.मदत ६१.वखार ६२.खोपा ६३.जाहीर ६४.लता ६५.हतबल ६७.फक्त ६८.रमणी ६९.वरात ७१.बीट ७२.सखी ७३.वन्य ७५.लवकर ७८.रबर ८०.शेपू ८१.आसपास ८३.पर ८४.खळ ८५.श्री ८६.पावा ८७.कबड्डी ८८.सकस ९२.चॅपलीन ९३.रेखा ९४.लवाद

**उभे उत्तर** - १.प्रणव २.गय ३.मानस ५.कडा ६.रसना ८.गवई ९.नस १०.प्रपाठक ११.अवधी १२.लकब १४.काक १६.नक्की १९.रडतखडत २१.नळी २२.टाच २३.आजोबा २५.वारा २६.गोड २८.मदन २९.रवका ३०.वपा ३२.जून ३३.अंमल ३४.इकडे ३५.लीला ३८.रवा ४०.सच्छिद्र ४२.शीर ४४.गाजरपारखी ४६.राजा ४७.बाही ४९.सटरफटर ५१.वीज ५२.पदरव ५४.स्तब्धता ५६.व्यथित ५७.नवल ६०.मही ६३.जाणीवपूर्वक ६४.लत ६५.हकालपट्टी ६६.बलाक ७०.राक्षस ७२.सर ७४.मास ७६.वर ७७.रखवाली ७९.बकबक ८१.आज्ञा ८२.पाठिंबा ८६.पाप ८८.सखा ८९.सल ९०.मंद ९१.जीत

## सोभाव (सुत्र२)
## आपला सोभाव आपूनच घडावतस



मानूसना सोभाव हाऊ कायीत्याना जनमना सोबत येत नै.पन सोभाव हाऊ तो जनमले येवानंतर बनस.मूल जनमले येताबरोबर पयले टँव.....टँव... असा रडाना आवाज काढस.तो रडाले लागना तव्हय पासून त्यानी सोतानी जानीव (अस्मिता) दखाडस.तो रडस तव्हय आपले सांगस माले जीवंत रआव्हआनं से. आपून बी म्हनतस मूल जनमले येवानंतर लग्नं नै ते आपले शंका येवाले लागस.म्हनासन जनमले येता खेपे रडाले लागस.आपून जित्ता सेत असं तो पयल लखन दखआडस. त्यानी जगानी तो पयली वयख ठेवस. जनमले येताच तो आवाज काढस.त्याले आपून रडनका नांव ठेवतस.

खंर ते त्या रडन रहात नै.त्याना तो पयला श्वास लेस.त्याना तो आवाज काढस त्याले आपून रडनं म्हनतस.पुढे तो रडता रडता हासाले लागस.हासनं हाईच आपलंमनना एक बीजभाव -हास.रडता-रडता आनी हसता-हसतात्यिनं मन बी तयार व्हवाले लागस.मन काही जनमले येताबरबर येत नै.मन नी जानीव म्हना की ईकास म्हना तो धीरे धीरे व्हत -हास.समदा मनना ईकास हाऊ भलताच थोडासना व्हस. म्हनीसनम्हनतस की मननं बालशरीरना आवाज -हास.पुढे सोतानी खरी जानीव (अस्मिता) मन, मानवी देह, प्रकृती आनी जनमती मायलेबी त्या चांगल्या वाईट सवयी ह्या समदांपासून मानूसना सोभाव घडस.या बनायेल सोभाववर पुढे बुध्दीना आनी घरदारनी परिस्थितीना संस्कार व्हता.मंग त्याच त्याना सोभाव घडाले कारन व्हतीस.या सवयी माय जशा लाईक तशा त्या लागतीस. म्हनीसन सोभाव हाऊ कायी सोता आसी वस्तू नै. ती समद्या गोष्टीसमुये व्हतीस. मानूसना सोभाव असा पक्का घडस जास तसा तो पुढे बी जास.निंबर डोरलं बनस. खरं सांगाले गये ते सोभाव हाऊ सारखा बदलत -हास एवढंच नै ते तो मरेपर्यंत त्याना सोभाव हाऊ कायी एकच -हात नै. तो जशी परिस्थिती बदलत जास तशी शेवटपर्यंत मानूसना सोभाव बी बदलत जास.जो जसा सोभाव बदलत -हास तोंच जीवनमा बी मोठा व्हत -हास.त्यालेच समद यश बी मियत जास.त्यानाच समदा उदोउदो बी व्हस.सोभाव चांगला, वाईट,प्रेमय,रागीट असा कोनी जनमना बरोबर लयत नै.जर सोभाव हाऊ जनमना बरोबर सोयंभू असा ते नीति, अनीति ना धडा शिकाडानी गरज कसाले लागती.चांगल आनी वाईट हाई बी त्याले समजाडानी गरज कसाले -हाती? घरमातलं आनी शायमातलं शिक्शान या संस्था बी जनमले येत्या नैत.आजनी जी परिस्थिती दिखी -हायनी ती हजारो वरीसपाशीन बनत येयेल शे.या परिस्थितीना उमज याले अंदाजे कसा पडीन यांनी खरी जानीव (अस्मिता) शरीरधर्मनीनी वयख करांनी ताकद.

**- डॉ.प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर. अहिरानी अनुवाद,**
**- प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### चांदवडला सहा घरफोडया, टोळी गजाआड

**नाशिक ।** सुमारे तीन महिन्यांपूर्वी एकाच रात्रीत चांदवड शहरातील सहा दुकानांमध्ये झालेल्या घरफोडीप्रकरणी दोघा संशयितांना उत्तर प्रदेशमधून अटक करण्यात आली असून त्यांना चांदवड न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. चांदवड शहरातील चांदवड-मनमाडरोड परिसरातील रेणुका कलर वर्ल्ड, झांबरे पैठणी, श्री स्वामी समर्थ कृषी सेवा केंद्र, इंदुमती बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्था, जाधव आणि कंपनी ॲग्रो मॉल या दुकानांसह साहेबराव भागूजी गुंजाळ यांच्या घरात दि. २७ मे २०२३ रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करुन एकूण ४५ हजार १७० रुपयांचा ऐवज चोरुन नेला होता. याप्रकरणी पोलिसांनी भ्रमणध्वनीची माहिती, सीसीटीव्ही फुटेज यांच्या आधारे तपासचक्रे फिरवून सेंधवा, मध्य प्रदेश येथून संशयित जितू हरसिंग आर्य (२३, रा. खामपानी, ता. नेवासा, जि. बडवानी, मध्यप्रदेश) व दिलीप रुमालसिंग जाधव (२२, रा. नवलपुरा ता. सेंधवा, जि. बडवानी, मध्य प्रदेश) यांना ताब्यात घेतले.

### दारूला पैसे न दिल्याने चाकूने वार

**धुळे ।** साक्री तालुक्यातील बळसाणे गावात दारू पिण्यासाठी पैसे न दिल्यामुळे विनोद निंबाजी हालोरे (वय २३) या तरुणाला सोनू उर्फ राजेंद्र सोनू बागुल याने दमदाटी केली. तसेच चाकूने वार करून जखमी केले. निजामपूर पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रात्रीच्या वेळेस वीज पुरवठा खंडीत न होण्यासाठी ठोस उपाययोजना करा

## खा. गोडसे यांची वीज मंडळाकडे आग्रही मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

आधीच पाऊस कमी पडत असल्याने शेतीमालाची लागवड कमी होत आहे. अशातच रात्रीच्या वेळेस सतत वीजपुरवठा खंडित होत असल्याने ग्रामीण भागातील रहिवाशांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. यातून त्यांच्या भावनांचा उद्रेक होण्याची शक्यता आहे. आधीच ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर वाढल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अवास्तव लोडशेडिंगमुळे त्रस्त झालेल्या ग्रामीण भागातील शेतकरी आणि नागरिकांना दिलासा देणे अत्यंत गरजेचे आहे. रात्रीच्या वेळेस वीजपुरवठा खंडित होणार नाही यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची आग्रही मागणी खा. हेमंत गोडसे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी वीज मंडळाकडे केली आहे.

पावसाळा सुरू होऊन दोन महिने उलटले तरी जिल्ह्यामध्ये समाधानकारक पाऊस पडलेला नाही. यामुळे लागवड झालेली पिके धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अपुऱ्या पावसामुळे तर अनेक शेतकऱ्यांनी पिकांची लागवडच केलेली नाही. अशा परिस्थितीमुळे शेतकरी चिंतेत आहे. अशातच सर्वत्र बिबट्यांचा खुला वावर वाढल्याने ग्रामीण भागातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तासनतास वीजपुरवठा खंडित होत असल्याने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी दोन दिवसांपूर्वी खा. गोडसे यांची भेट घेत वीज महामंडळ प्रशासनाच्या विरोधात आपल्या व्यथा



मांडल्या होत्या.

ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी काल खा. गोडसे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने वीज महामंडळाचे कार्यकारी अभियंता डोंगरे यांची भेट घेतली. पाऊस नसताना लागवड झालेल्या पिकांचे भवितव्य अंधारमय झाले आहे. बिबट्यांच्या खुल्या वावरामुळे नागरिक भयभीत झालेले आहेत. यंदा पुरेसा पाऊस पडेल की नाही याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. रात्रीच्या वेळेस होणाऱ्या अवास्तव लोडशेडिंगमुळे ग्रामीण भागातील रहिवाशांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. एक तर वीज विकत घेऊन वीजपुरवठा सुरळीत करा किंवा शहर आणि ग्रामीण

**रात्रीच्या वेळेस तासनतास लोडशेडिंग होत असल्याने त्रस्त नागरिकांच्या भावनांचा कधीही उद्रेक होवू शकतो. आम्ही आपणापुढे सामांजस्याने लोडशेडिंग विषयीच्या तक्रारी वजा व्यथा मांडत आहोत. येत्या काही दिवसात ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी विजेचा प्रश्न न सुटल्यास शिवसेना स्टाईल आंदोलन छेडत धडा शिकवला जाईल असा इशारा शिवसेनेचे सह संपर्क प्रमुख गणेश कदम, जिल्हाप्रमुख अनिल ढिकले यांनी वीज महामंडळाच्या प्रशासनाला दिला आहे.**

भागातील विजपुरवठा बॅलन्स करून वीज वितरणात सर्वांना समान न्याय देण्याच्या सूचना करत ग्रामीण भागात रात्रीच्या वेळेस विजापुरवठा खंडित होणार नाही यासाठी ठोस उपाययोजना तातडीने करण्याची आग्रही मागणी खा. गोडसे यांनी केली आहे. यावेळी सह संपर्कप्रमुख गणेश कदम, इगतपुरीचे माजी आमदार काशिनाथ मेंगाळ, जिल्हाप्रमुख अनिल ढिकले, जिल्हा संघटक योगेश म्हस्के इगतपुरीचे माजी आमदार पांडुरंग गांगड, संपत काळे शिलापूरचे सरपंच पवन कहांडोळ, सैय्यद पिंप्रीचे सरपंच भाऊसाहेब ढिकले, कैलास पोटिंदे, ओढयाचे निलेश पेखळे आदिंसह ग्रामीण भागातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पानवेलींपासून तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करुन द्यावी : विभागीय आयुक्त

### गोदावरी प्रदूषण नियंत्रण समितीच्या बैठक संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेने पानवेलींपासून विविध घरगुती उपयोगाच्या वस्तू बनविण्याची कार्यशाळा आयोजित करुन महिलांना प्रशिक्षण दिले असून सदरचा उपक्रम स्तुत्य आहे. तसेच प्रशिक्षित महिलांनी गोदावरी नदीतील पाणवेलीपासून बहुपयोगी उत्कृष्ट अशा वस्तु तयार केल्या आहेत. या महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना फॅब इंडिया, अमेझॉन इत्यादी सारखे व्यवसायिक ब्रॅण्ड उपलब्ध करुन द्यावे, असे विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी सांगितले.

गोदावरी प्रदूषण नियंत्रण समितीची आढावा बैठक विभागीय आयुक्त




कार्यालयात घेण्यात आली. त्यावेळी विभागीय आयुक्त श्री.गमे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, निरीचे वरीष्ट शास्त्रज्ञ डॉ.नितीन गोयल, उपायुक्त (करमणूक शुल्क) डॉ.राणी ताटे, उपायुक्त मनपा विजयकुमार मुंडे, जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दीपक पाटील, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी अमर दुर्गळे, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत मोरे, उपसंचालक (माहिती) ज्ञानेश्वर इगवे, गोदावरी समितीचे तज्ज्ञ सल्लागार डॉ.प्राजक्ता बस्ते, याचिकाकर्ते निशीकांत पगारे, राजेश पंडीत आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे म्हणाले की, जिल्हा परिषदेप्रमाणे महानगरपालिकेने देखील त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या बचतगटांना पानवेलींपासून विविध वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षणाबरोबरच प्रशिक्षणात कार्यालयील कामकाजात आवश्यक असणाऱ्या स्टेशनरी बनविण्याचे देखील प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच 'GEM' पोर्टलवर देखील या बचतगटांचे रजिस्ट्रेशन करावे, जेणेकरुन त्यांना विक्रीसाठी व्यासपीठ मिळेल, असेही श्री गमे यांनी यावेळी सांगितले.

गणेशोत्सवातील पावित्र्य आणि पर्यावरण संरक्षणासाठी गणेशोत्सव पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन करुन यावेळी समितीसमोर आलेल्या तक्रारींचे निरसन केले. यावेळी सगुणा रुरल फाँडेशन, नेरुळ यांनी पानवेली नष्ट करण्याबाबतचे पी.पी. टीद्वारे सादरीकरण केले. तसेच यावेळी पानवेली पासून बहुउपयोगी वस्तू बनवण्याचे प्रशिक्षण घेतलेल्या चांदोरी येथील महिलांचा सत्कार करण्यात आला, गोदावरी गीत लिहीणाऱ्या प्रा.सुरेखा बोऱ्हाडे, पर्यावरणपुरक मोहरम साजरा करणाऱ्या बोहरी कम्युनिटीचा सत्कार यावेळी श्री गमे यांच्या हस्ते करण्यात आला.

# मंत्री भुजबळ यांच्या विरोधात वक्तव्य करणाऱ्या विश्वजीत देशपांडेला अटक करा



### नाशिक माळी समाजाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**

परशुराम संघाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत देशपांडे याने मंत्री छगन भुजबळ यांच्या विरोधात केलेल्या वादग्रस्त विधानाचा निषेध म्हणून नाशिक शहरातील माळी समाजाच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधी यांना निवेदन देण्यात आले. महात्मा फुले समाज विकास संस्था, माळी समाजसेवा परिषद अखिल भारतीय माळी महासंघ, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, श्री संत सावता माळी मंडळ, महात्मा फुले विचार मंच, श्रीमान सत्यशोधक प्रतिष्ठान या संस्थांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, ना. छगन भुजबळ हे बहुजन समाजाचे आधारस्तंभ, मार्गदर्शक असून ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी आपलं आयुष्य खर्ची घालत ओबीसी समाजाला न्याय व हक्क देण्याचे काम करत आहेत. त्यामुळे त्यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या प्रवृत्तीचा आम्ही निषेध करतो. वेळप्रसंगी माळी समाजासह ओबीसी समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करेल. समाज समाजात जाती-जातीत भांडण लावणाऱ्या या मनुवादी वृत्तीचा आम्ही निषेध करतो. ना. भुजबळ यांच्याबाबत वेळोवेळी अपशब्द वापरून अवमान करणाऱ्या प्रवृत्तीचाही आम्ही निषेध करतो. त्यामुळे परशुराम संघाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत देशपांडेला त्वरित अटक करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. अन्यथा माळी समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.

यावेळी विजय राऊत, शंकर मोकळ, संदीप जगताप, पप्पू शिंदे, मोहन माळी, श्रीराम मंडळ, गुलाब माळी, विलास वाघ, विनोद डोके, गणेश खोडे, संतोष पुंड, दिपक मंडलिक, नाना नाईकवाडे, महेश ढोले, ज्ञानेश्वर सोमासे, पोपटराव जेजुरकर, मच्छिंद्र माळी, शिवा बागुल, दादाजी अहिरे, सचिन जगताप यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचा समस्या मार्गदर्शन, प्रवचन, दर्शन सोहळा

**नाशिक । प्रतिनिधी**

जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचा समस्या मार्गदर्शन, प्रवचन व दर्शन सोहळ्याचे आयोजन जनम संस्थानाच्या रामशेज किल्ल्याजवळील आशेवाडी येथील उत्तर महाराष्ट्र उपपीठ आश्रमात करण्यात आले आहे. श्रावण मासात हा सोहळा आल्याने या सोहळ्यास हजारो भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज आहे. यामुळे उपपिठाच्यावतीने सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २७ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजेपासून समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा पार पडणार आहे. याच दिवशी नवीन साधकांना साधक दिक्षा दिली जाणार आहे. उपपीठावर बांधण्यात आलेल्या सभागृहाचे लोकार्पण दि. २८ ऑगस्ट रोजी जगद्गुरू श्रींच्या हस्ते होणार आहे. नंतर सिद्ध पादुका असलेल्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मिरवणुकीनंतर माऊलींच्या सिद्ध पादुकांचे विधीवत पूजन करून पादुका स्थापना करण्यात येणार आहेत. नाशिक उपपीठावर पहिल्यांदाच माऊलींच्या



अमृततुल्य प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे. स्वप्नातही कोणाचे वाईट चिंतू नका. तुम्ही जगा, दुसऱ्याला जगवा असे नरेंद्राचार्य महाराज यांचे विचार आहेत. विज्ञानाची सांगड घालून जीवन कसे जगावे? यावर स्वामीजी मार्गदर्शन करणार आहेत. विज्ञान व अध्यात्म यांची सांगड घालून मानवास येणाऱ्या समस्यांवर देखील यावेळी मार्गदर्शन केले जाणार आहे.

सामाजिक व अध्यात्मिक कार्य करणाऱ्या जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज यांच्या समस्या मार्गदर्शन, प्रवचन व दर्शन सोहळ्याचा लाभ भाविकांनी घेऊन त्यांचे मौलिक विचार ऐकावे असे आवाहन जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानाच्या उत्तर महाराष्ट्र उपपीठ समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपुर, ता. जि. धुळे येथिल सर्व्हे नं. ५३ यापैकी प्लॉट नं. ५७ यांसी वि.सि.स.नं. ५२३५ यामधील बांधीव रुख्मीणी अपार्टमेंट मधील दुसऱ्या मजल्यातील सदनिका क्रं. १६ चे क्षेत्र २७.२३ चौ. मी. बिल्टप एरिया यांसी षटः सिमा मंजुर बांधकाम नकाशा प्रमाणे येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत कै. गणपत निवृत्ती रोकडे यांचे मालकी हक्काची होती, ते दिनांक २८/०३/२०१० रोजी मयत झाले असुन त्यांचे कायदेशिर वारस म्हणुन श्रीमती. नंदा गणपत रोकडे व कृतिका गणपत रोकडे, दोघे रा. फ्लॅट नं. १६, रूख्मीणी अपार्टमेंट, प्लॉट नं. ५७, शारदा नगर, देवपुर, धुळे यांचे नाव मालकी हक्काने लागलेले असुन त्यांनी नमुद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल श्री. आकाश मदन चोपडेकर, रा. २७, संकल्प कॉलनी, राजगुरू नगर, देवपुर, धुळे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांनी सदरहु मिळकत खरेदी करणे हेतु एच.डी.एफ.सी. बँक लि. शाखा देवपुर, धुळे यांच्याकडे गृह कर्जासाठी प्रस्ताव सादर केलेला असुन त्या अनुषंगाने सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहु मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बॅन्का व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, ज. मु., वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीत कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योगे ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटुन आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजुन अथवा कोणाचे हक्क, हितसंबध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजुन सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहिर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमुद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे:
दिनांक : २४/०८/२०२३

**श्री. आकाश मदन चोपडेकर** — **ॲड. विजय म.मोरे**
रा.बी/१२, भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे

---

**प्रोसेस जमा** — **ॲड. पुनम एस. काकुस्ते**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं.२३०/२०२३**

१) गं. भा. मंगलादेवी शालीग्राम निकम, वगैरे- **...अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

कोणीही नाही **... जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. २०/७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ७ यांचे वडील नामे कै. शालीग्राम दौलत निकम यांचे दि. ३१/०३/२०२१ रोजी मौजे कासारे, ता. साक्री जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) गं. भा. मंगलादेवी शालीग्राम निकम (पत्नी) २) सौ. योगिता रविंद्र बिरारीस (मुलगी) ३) सौ. सविताबेन प्रदिपभाई पाटील (मुलगी) ४) सौ. वैशाली राहूल सोनवणे (मुलगी) ५) सौ. पुनम किरण जोशी (मुलगी) ६) सौ. हर्षाली मिलींद देवरे (मुलगी) ७) गौरव शालीग्राम निकम (मुलगा)

मयतास वरील प्रमाणे वारस असून यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खाते निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि.२५/८/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

(शिक्का)

**कामगिरी कारकुन**
**दिवाणी न्यायालय कोर्ट ,साक्री**

**अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय कोर्ट ,साक्री**

# नाशकात एनएसइतर्फे मोफत प्रशिक्षण कार्यशाळा

### शेअर मार्केटमधील सुरक्षित गुंतवणुकीबाबत उपयुक्त माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याचा कल अलीकडे दिवसेंदिवस वाढीस लागला आहे. परंतु सुरक्षित गुंतवणूक कशी करावी, या संदर्भात नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडतर्फे नाशिक येथे पत्रकारांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. एनएसईचे चीप मार्केटिंग अँड कम्युनिकेशन ऑफिसर अरीजित सेनगुप्ता, प्रियंका रॉय व तज्ज्ञांनी यावेळी मार्गदर्शन केले.




**एनएसई हा शेअर बाजारातील सहभागी घटकांसाठी गेल्या तीन दशकांपासून विश्वासाई प्लॅटफॉर्म आहे. ट्रेडिंगमध्ये सुरक्षितता व लवचिकता राखण्यासाठी ठोस तंत्रज्ञानाचा वापर करणारा प्लॅटफॉर्म म्हणून एनएसई ओळखला जातो. त्यामुळे रिटेल गुंतवणूकदारांसाठी 'काय करा' आणि 'काय करू नका' याची माहितीही यावेळी देण्यात आली.**

भारतातील आघाडीचा शेअर बाजार नॅशनल स्टॉक एक्स्चेंजने (एनएसई) सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया अर्थात सेबीची मंजुरी घेऊन, १५ मे २०२३ रोजी, रुपयाचे वर्चस्व असलेली एनवायएमईएक्स डब्ल्यूटीआट क्रुड ऑइल अँड नॅचरल गॅस फ्युचर्स कॉँट्रॅक्ट्स, आपल्या कमोडिटी डेरिएटिव्ह्ज विभागात आणली आहेत. नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि. (एनएसई) हे भारतातील अग्रगण्य स्टॉक एक्सचेंज असून संख्येनुसार जगातील दुसरे सर्वात मोठे स्टॉक एक्सचेंज आहे. वर्ल्ड फेडरेशन ऑफ एक्सचेंजेसच्या अहवालानुसार जानेवारी ते जून २०१८ पर्यंत इक्विटी शेअर्समधील व्यवहार, तर एनएसईने १९९४ मध्ये इलेक्ट्रॉनिक स्क्रीन-आधारित ट्रेडिंग, डेरिव्हेटिव्ह ट्रेडिंग (इंडेक्स फ्युचर्सच्या स्वरूपात) आणि सन २००० मध्ये इंटरनेट ट्रेडिंग सुरू केले, ते भारतात या प्रकारचे पहिले होते. एनएसईकडे एक्सचेंज सूची, ट्रेडिंग सेवा, क्लिअरिंग आणि सेटलमेंट सेवा, निर्देशांक यांचा समावेश असलेला पूर्णतः एकात्मिक व्यवसाय मॉडेल आहे. तुमचा लॉगइन आयडी, पासवर्ड, ओटीपी, टीपीआयएन कोणत्याही परिस्थितीत, अन्य कोणत्याही व्यक्तीला, यात ब्रोकरकडील कर्मचाऱ्यांचाही समावेश होतो, परंतु त्यांना सांगू नका. एनएसई नियमितपणे गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम राबवत असते आणि आपल्या वेब पोर्टलवर ऑनलाइन शैक्षणिक साहित्य प्रसिद्ध करत असते. भांडवल बाजारातील गुंतवणूक, मार्जिनविषयक दंड, कॉर्पोरेट कृती, गुंतवणूकदार तक्रार निवारण यंत्रणा आदींची माहिती याद्वारे गुंतवणूकदारांना दिली जाते, असेही या कार्यशाळेत सांगण्यात आले.

## न्यूज कॉलम

### लाड येथे विद्यार्थिनी कृषिकन्यांचे आगमन

धुळे । कुसुंबा (ता. धुळे) महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत कृषी विद्यापीठ, राहुरी येथील अंतिम वर्षातील विद्यार्थिनी कृषिकन्या वैशाली बागूल, कांचन बागूल, प्राची लाळगे, सानिका जगताप, पूजा मुळे, श्वेता मिसाळ यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अकलाड येथे सर्वेक्षण केले. सर्व कृषिकन्यांचे लोकनियुक्त सरपंच अजय गोविंदराव सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य आनंदा ठाकरे, प्रगतिशील शेतकरी महेंद्र चव्हाण, नवल बाविस्कर, सुनील महाजन, नरेंद्र सूर्यवंशी, धनराज बाविस्कर, हृषीकेश गवळे, नाना खलाणे, भय्या खलाणे, सुहास गावडे यांनी स्वागत केले.

### नवागाव येथे शिधापत्रिकांचे वितरण

**धुळे।** शिरपूर तालुक्यातील बुडकी ग्रामपंचायतींतर्गत नवागाव पाड्यावरील वंचित शिधापत्रिकांचे नुकतेच वितरण करण्यात आले. नवागाव येथील अनेक कुटुंबे काही वर्षांपासून शिधापत्रिकांपासून वंचित होती. गावातील ५२ लोकांनी त्यासाठी २०२१ मध्ये तहसील कार्यालयात नवीन रेशनकार्ड मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता. बन्सीलाल पावरा यांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केल्याने जुलै २०२२ मध्ये २२ लाभार्थ्यांना केशरी कार्डचे वाटप करण्यात आले होते. ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार पिवळी शिधापत्रिका देण्यात आली.

# लम्पी स्कीन आजारापासून पशुधनास सुरक्षित ठेवण्यासाठी लसीकरण करा : जिल्हाधिकारी

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विविध ठिकाणी जनावरांमध्ये लम्पी स्कीन डीसीज या साथरोगाची लक्षणे आढळून येत असल्याने लम्पी स्कीन रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने त्वरीत लसीकरण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिले. लम्पी स्किन डीसीजचा प्रसार प्रतिबंधित करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री.गोयल यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. आर.एम.शिंदे, जि.प.चे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. राजेंद्र लंघे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.स्वप्निल सांगळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, जिल्ह्यातील विविध ठिकाणी जनावरांमध्ये लम्पी स्कीन डीसीज या साथरोगासारखी लक्षणे आढळून येत असल्याने या रोगाचा प्रादुर्भाव जिल्ह्यातील इतर ठिकाणी होऊ नये यासाठी जनावरांमध्ये रोग सदृश्य लक्षणे आढळणार्या केंद्रबिंदूपासून ५ किलोमीटर परिसरात लसीकरणास सुरुवात करावी. यासाठी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाने नियोजन करावे. लसीकरणासाठी उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करुन लसीकरणास गती द्यावी. लसीकरणाबाबतचा दैनदिन अहवाल सादर करावा. जिल्हास्तरीय कार्यदलाने प्रादुर्भाव झालेल्या क्षेत्रास वेळोवेळी भेटी द्याव्यात असेही त्यांनी सांगितले. लम्पी स्किन डिसीज रोग नियंत्रण तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून गोजातीय प्रजातींची सर्व गुरे व म्हशी यांची ज्या ठिकाणी ते पाळले (ठेवले) जातात त्या ठिकाणापासून नियंत्रित क्षेत्रातील किंवा त्या क्षेत्राबाहेरील अन्य कोणत्याही ठिकाणी ने-आण करण्यास मनाई करण्यात आली असल्याने यासाठी पोलीस विभागाची मदत घेवून एकाही जनावराची वाहतुक होणार नाही याची दक्षता घ्यावी. बाधित पशु निदर्शनास आल्यास त्याची माहिती तात्काळ संबंधित ग्रामपंचायत व नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेला देण्यात यावी. तसेच पशु बाजारामध्ये यापुढे टॅगींग व रोग प्रतिबंधक लसीकरणाची खात्री झाल्याशिवाय खरेदी जनावराची खरेदी विक्री करु नये. लस ही पुर्णतः मोफत उपलब्ध असल्याने पशुपालकांनी पशूंना साथीच्या रोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांच्याकडील गाय व म्हैस वर्गातील सर्व निरोगी पशुंना साथीच्या रोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहनही श्री.गोयल यांनी यावेळी केले.

यावेळी श्री. शिंदे म्हणाले की, जिल्ह्यात गोट पॉक्स लस मुबलक प्रमाणात उपलब्ध असून आहे. पशुपालकांनी जवळच्या पशुवैद्यकीय संस्थेतील अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संपर्क साधून जनावरांचे त्वरीत लसीकरण करून घ्यावे, तसेच आजारी जनावरे आढळल्यास पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधावा. तसेच नगरपालिका, महापालिकेने आपल्या क्षेत्रातील मोकाट जनावरांना बंदिस्त करुन त्यांचे लसीकरण तसेच जनावराचे टॅगींग करुन घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. बैठकीस सर्व तहसिलदार, गट विकास अधिकारी, सहकार विभाग, तसेच संबंधित यंत्रणांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. तसेच नगरपालिका, महापालिकेने आपल्या क्षेत्रातील मोकाट जनावरांना बंदिस्त करुन त्यांचे लसीकरण तसेच जनावराचे टॅगींग करुन घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. बैठकीस सर्व तहसिलदार, गट विकास अधिकारी, सहकार विभाग, तसेच संबंधित यंत्रणांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



### लम्पी स्कीन संसर्ग केंद्रापासूनचा ५ किमी परिसर बाधित क्षेत्र

**धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील देवभाणे, सातरणे, न्याहळोद, विंचूर, सडगाव व साक्री तालुक्यातील अमोदे, वाघापुर, दिघावे येथील जनावरांमध्ये लम्पी स्कीन डीसीज या साथरोगाचा निष्कर्ष होकारार्थी आला आहे. या रोगाचा प्रसार जिल्ह्यातील अन्य ठिकाणी होवू नये म्हणून प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार संसर्ग क्षेत्रापासून पाच किलोमीटरचा परिसर बाधित क्षेत्र म्हणून घोषित करीत असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अभिनव गोयल यांनी दिले आहेत. त्यानुसार लम्पी स्कीन रोग प्रादुर्भावग्रस्त गावांपासून १० किलोमीटर त्रिज्येच्या परिसरातील जनावरांची खरेदी, विक्री, वाहतूक बाजार, जत्रा व प्रदर्शने आयोजित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. बाधित गावांमध्ये तसेच क्षेत्रभोवतालातील पाच किलोमीटर परिघातात गोट पॉक्स लसीचे लसीकरण करण्यात यावे. उपरोक्त कायद्याशी सुसंगत कृती न करणार्या आणि कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये अडथळा निर्माण करणार्या पशुपालक, व्यक्ती, संस्था, प्रतिनिधी यांचेविरुध्द नियमानुसार गुन्हा दाखल करण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील सहायक आयुक्त, पशुधन विकास अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत असल्याचेही श्री. गोयल यांनी आदेशात नमूद केले आहे.**

# स्वराज्यच्या प्रथम वर्धापनदिनास नाशिक जिल्ह्यातून हजारो पदाधिकारी, कार्यकर्ते मुंबईला जाणार

### स्वराज्य प्रदेश संपर्क प्रमुख करण गायकर यांची माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**



स्वराज्य प्रमुख छत्रपती संभाजी महाराज यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली मुंबई येथे होणाऱ्या स्वराज्य पक्षाच्या पहिल्या वर्धापनदिन नियोजना संदर्भात काल नाशिक जिल्हा आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. बैठकीत स्वराज्य पक्षाचे महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख करण गायकर, उत्तर महाराष्ट्र प्रमुख केशव गोसावी, उत्तर महाराष्ट्र सचिव शिवाजी मोरे, उत्तर महाराष्ट्र महिला आघाडी प्रमुख मनोरमा पाटील तसेच राज्य कार्यकारणी सदस्य विजय वाहुळे, नवनाथ शिंदे, ज्ञानेश्वर थोरात, पुष्पा जगताप, नाशिक जिल्हा प्रमुख आशिष हिरे, पुर्व विभाग जिल्हा प्रमुख प्रा.उमेश शिंदे, जिल्हा संपर्कप्रमुख गुंडाप्पा देवकर, कायदा आघाडी उत्तर महाराष्ट्र प्रमुख ड. नवनाथ कांडेकर, आयटी प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले, शेतकरी आघाडी जिल्हाप्रमुख विजय खर्जुल, युवक जिल्हाप्रमुख नितीन दातीर, व्यापारी आघाडी जिल्हाप्रमुख नारायण जाधव, उपजिल्हाप्रमुख डॉ.महेंद्र शिरसाट, कामगार आघाडी जिल्हाप्रमुख दिनेश नरवडे, ज्ञानेश्वर कोतकर, जिल्हा कार्याध्यक्ष नवनाथ वैराळ, युवक महानगरप्रमुख पुंडलिक बोडके, विद्यार्थी आघाडी महानगरप्रमुख सागर पवार, महिला आघाडी जिल्हाप्रमुख सुलक्षणा भोसले, महिला आघाडी महानगरप्रमुख निशिगंधा पवार, वाहतूक आघाडी जिल्हाप्रमुख उत्तम कापसे, आयटी उत्तर महाराष्ट्र प्रमुख किरण बोरसे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

स्वराज्यप्रमुख छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वराज्य पक्षाचा पहिला वर्धापन दिन मुंबई येथे रविवार दि. २७ ऑगष्ट रोजी सकाळी अकरा वाजता यशवंतराव चव्हाण हॉल, मुंबई, मंत्रालयाजवळ आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमासाठी नाशिक जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने स्वराज्यचे शिलेदार त्या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. संपूर्ण मुंबईमध्ये स्वराज्यचे भगवं वादळ धडकणार असल्याचा संकल्प सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

बैठकीच्या अध्यक्षीय भाषणात प्रदेश संपर्कप्रमुख करण गायकर यांनी सांगितले की, शेती, सहकार, कामगार, शिक्षण, आरोग्य या पंचसूत्रीप्रमाणे वर्षभरातील कामाचा लेखाजोखा या वर्धापनदिनाला मांडला जाणार आहे. नाशिकहून मुंबईकडे हजारोंच्या संख्येने एकत्रितपणे रेल्वेने प्रवास करणार असल्याचे यावेळी ठरविण्यात आले. प्रास्ताविक प्रा.उमेश शिंदे यांनी तर आभार नाशिक जिल्हाप्रमुख आशिष हिरे यांनी मानले. बैठकीला युवक जिल्हा संपर्कप्रमुख नितीन पाटील, जिल्हा संघटक दत्ता हराळे, शेतकरी आघाडी संपर्कप्रमुख भारत पिंगळे, कामगार आघाडी संपर्कप्रमुख सुभाष गायकर, आयटी जिल्हाप्रमुख शुभम देशमुख, नाशिक तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर सहाने, इगतपुरी तालुकाप्रमुख नारायण भोसले, त्रंबकेश्वर तालुका प्रमुख संतोष मिंदे, दिंडोरी तालुका प्रमुख सचिन जाधव, मालेगाव तालुका प्रमुख अनिल निकम, निफाडचे सतीश नवले, चांदवडचे ललित उशिरे, येवल्याचे गोरख संत, सिन्नरचे योगेश शिंदे, नांदगावचे तालुका प्रमुख राकेश बोरसे, महिला आघाडी जिल्हा संपर्कप्रमुख रेखाताई पाटील, जिल्हा संघटक रेखा जाधव, उद्योजक महिला आघाडी महानगरप्रमुख मीनाक्षी पाटील, उपमहा नगर प्रमुख रागिनी आहेर, चारुलता सूर्यवंशी, नाशिक तालुकाप्रमुख योगिता ढोकणे, आयटी महानगर प्रमुख काजल देवरे, दिंडोरी तालुकाप्रमुख नेहा नाठे, तालुका संपर्कप्रमुख मुक्ता बर्वे, रेणुका पेखळे, पूजा चव्हाणके, शुभांगी पेखळे आदींसह नाशिक जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बहादरपूरच्या सुपुत्राची 'सहाय्यक सरकारी अभियोक्ता'पदी निवड

**धुळे । प्रतिनिधी**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नुकत्याच घेण्यात आलेल्या 'सहाय्यक सरकारी अभियोक्ता' या परीक्षेत धुळे जिल्हा न्यायालयातील ॲड. दिपक अभिमन मोरे यांनी यश संपादन केले असून त्यांची 'सहाय्यक सरकारी अभियोक्ता महाराष्ट्र राज्य (वर्ग-१)' पदी निवड झाली आहे. विशेष म्हणजे पहिल्याच प्रयत्नात त्यांनी हे यश संपादन केले असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे जानेवारी २०२२ मध्ये सहायक सरकारी अभियोक्ता गट - अ पदाकरीता जाहिरात प्रसिद्ध झाली होती. त्यानुसार सप्टेंबर २०२२ मध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यात प्राविण्य प्राप्त करणार्या उमेदवारांच्या मुलाखती मे २०२३ मध्ये पुणे येथील यशदा येथे एमपीएससी मार्फत घेण्यात आल्यात. दोन्ही टप्यांमध्ये यशस्वीपणे प्रावीण्य प्राप्त केल्यानंतर एमपीएससीने अंतिम गुणवत्ता यादी नुकतीच प्रसिध्द केली. त्यात धुळे जिल्हा न्यायालयातील ॲड. दिपक अभिमन मोरे यांची सरकारी वकील अभियोक्ता पदी निवड केली असून शासनाकडे नियुक्तीसाठी तशी शिफारस केली आहे. ॲड. मोरे यांचा जन्म सर्वसामान्य कुटुंबातील आहे. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण रा.का. मिश्रा विद्यामंदिर बहादरपूर ता पारोळा जि. जळगाव येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय पारोळा येथे झाले. तर एलएल.बी चे शिक्षण देवपूर धुळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज येथे पूर्ण केले. तर एलएलएम संभाजी नगर येथे पूर्ण केले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणार्या परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला आहे. यात ॲड. मोरे यांनी यश मिळविले. तर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्रमिला नेवे यांचा सन्मानपत्र देऊन गौरव



**धुळे । जिल्हा प्रशासन व महानगरपालिका, यांनी आयोजित केलेले 'मेरी माटी, मेरा देश' अभियानातून शहिद वीर व स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृतींना वंदन या जिल्हास्तरीय कार्यक्रमाची सांगता समारंभात खासदार डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, यांच्या हस्ते स्वातंत्र्य सैनिकाची पत्नी श्रीमती. प्रमिला देविदास नेवे यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.**

# पेडकाई देवी मंदिराच्या परिसरात वृक्षारोपण

**चिमठाणे । प्रतिनिधी**



चिमठाणे साळवे येथील ३३ कुलाचे दैवत असलेले आई पेडकाई देवीच्या भव्य दिव्य मंदिराचा आराखडा काढून देणारे असे वास्तुविशारद शिल्पकार रवींद्र जी बेलपाठक यांच्या ७३ व्या वाढदिवसा निमीत्ताने मातेची नारळ फुलहार पूजा अर्चना करून साळवे येथील प्रगतिशील शेतकरी श्री मोतीलाल बारका बडगुजर व हातनूर येथील वाल्मिक दंगल पाटील ,रघुनाथ भाया पाटील तसेंच पेडकाई देवी मंदिराचा परिसरात नारळ, आहेर ,पूजा, विधी विकणारे दुकानदार व हॉटेल व्यवसायिक ,तसेंच पेडकाई देवी संस्थान विश्वस्त डाकोरसिंग गिरासे यांच्या उपस्थित पेडकाई देवी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे लावून रवींद्रजी बेलपाठक यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. ह्या वेळी मातेच्या दर्शना साठी आलेले भाविक भक्त ही उपस्थित होते.

# चांद्रयान चे चंद्रावर यशस्वी लॅंडिंग झाल्याबद्दल पिंपळनेर येथे आनंदोत्सव



**सामोडे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी पिंपळनेर शहरातर्फे भारतीय अंतराळ संस्था इस्त्रो यांच्या प्रयत्नांतून चांद्रयान ३ यशस्वी मोहीम झाल्या बद्दल फटाके व मिठाई वाटुन आनंद व्यक्त करण्यात आला.

त्यावेळी भाजपा धुळे जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप आबा कोठावदे, प्रताब आबा गांगुर्डे,शहराध्यक्ष नितीन कोतकर, सरचिटणीस अनिल जाधव, प्रशांत कोतकर,महाले सर,योगेश कोठावदे,आकाश पगारे, रामकृष्ण सोनवणे युवा मोर्चा शहराध्यक्ष,सौरभ कोठावदे दिपक नेरकर,प्रविण गांगुर्डे, सुरेश जगदाळे प्रदीप चव्हाण,उजेक पवार,किशोर कोतकर, विलास भामरे,आबा वाडेकर, दिलीप कोतकर रवि गांगुर्डे,सोनू याईस, प्रथमेश कोतकर,व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शिंदखेडा शहरात आनंदोत्सव साजरा

**शिंदखेडा ।** साऱ्या जगाचे लक्ष लागून असलेली चांद्रयान -३ मोहीम चे यशस्वी लॅंडिंग होऊन मोहीम यशस्वी झाल्यामुळे त्या निम्मिताने शिंदखेडा शहर भाजपाचा वतीने शहरातील भगवा चौक व छत्रपती शिवाजी चौफुली येथे फटाके फोडून आनंदोस्तव साजरा करण्यात आला. यावेळी गटनेते तथा मा. नगरसेवक अनिल वानखेडे, मा.पं स.सदस्य सुभाष माळी, प्रकाश चौधरी, मा.उपनगर अध्यक्ष प्रकाश देसले,उल्हास देशमुख,नगरसेवक चेतन परमार,उदय देसले, डॉ रवींद्र देसले,मनोहर पाटील,ॲड. विनोद पाटील,भाजपा शहर अध्यक्ष प्रवीण माळी,युवराज माळी,दादा मराठे,उमेश गिरासे सह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

# सातपूर, अंबड परिसरातील प्लॉटवर मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्या !

### एमआयडीसी अधिकाऱ्यांनी खाजगी विकासकांना ठणकावले

**नाशिक । प्रतिनिधी**



सातपूर आणि अंबड परिसरात खाजगी विकासकांनी विकसित केलेल्या प्लॉटवरील उद्योजकांना रस्ते, पथदीप मूलभूत सुविधा बाबत विकासक करीत असलेल्या टाळाटाळी बाबत निमाने आयोजित केलेल्या बैठकीमध्ये या सर्व सुविधा तातडीने उपलब्ध करून द्या जबाबदारी टाळू नका असा इशारा एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी आणि कार्यकारी अभियंता जयंत बोरसे यांनी खासगी विकासकांना उद्योजकांसमोरच लगेचच दूरध्वनीवरून दिला आहे.

सातपूर आणि अंबड परिसरात खाजगी विकासकांनी विकसित केलेल्या भूखंडांबाबत अनेक तक्रारी प्लॉटधारकांकडून निमाकडे आल्याने निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी त्याची तातडीने दखल घेऊन या प्लॉटधारकांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांबरोबर गुरुवारी सायंकाळी बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी त्या भूखंडांवरील उद्योजकांनी आपल्या संतापाला वाट मोकळी करून दिली. खाजगी विकासकांनी विकसित केलेल्या प्लॉटवर रस्ते बनवून देण्याची जबाबदारी खाजगी विकासकाची असतानाही नाही त्यांनी ते तयारच करून दिलेले नाहीत. ठिकठिकाणी खड्डे आणि प्रचंड प्रमाणात चिखलाचे साम्राज्य पसरले आहेत. पथदीपांचा पत्ता नाही आदी तक्रारी या सर्वांनी मांडल्या. त्यामुळे उद्योग सुरू करून दोन वर्षे झाले तरी सुद्धा खाजगी विकासकाच्या टाळाटाळ व अरेरावीपणामुळे उद्योजकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक उद्योजकांवर झालेल्या पोलीस कम्प्लेंट, आयकाराच्या नोटीसा, जुन्या देण्याबाबतच्या आलेल्या तक्रारी याही या उद्योजकांना आल्या आहेत. रस्त्यांची अवस्था इतकी बिकट आहे की एका उद्योजकाचे पाच कोटींपेक्षा अधिक रुपयांच्या किमतीचे मशीन घेऊन पडले आहे. मात्र ते त्याला फॅक्टरीत नेता येत नाही असे बेळे यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले. त्या परिसरात इतका चिखल इतका आहे की, ७० ते ८० उद्योजकांना स्वतःला जाणे येणे, कामगार यांना जाणे येणे व मालाचे ने आण करणे सुद्धा मुश्किल झाल्याची व्यथाही यावेळी मांडण्यात आली. मूलभूत सुविधांचा प्रश्न लवकर निकाली न निघाल्यामुळे कोट्यावधी रुपयांचे आमचे आर्थिक नुकसान होत असून याला जबाबदार खाजगी विकासकांवर कडक कारवाई करावी आणि त्याची जबाबदारी त्याला घ्यायला सांगावी असेही यावेळेस उद्योजकांनी सांगत असताना या बेजबाबदारपणाला जबाबदार कोण? असा सवालही या उद्योजकांनी केला.

# कांद्यावरील ४० टक्के निर्यात शुल्क मागे घ्यावे अन्यथा आंदोलन छेडणार– दिघोळे

**नाशिक । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क आकारण्याचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील व देशातील कांदा उत्पादकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणार असून गेल्या आठ महिन्यापासून कांद्याला कवडीमोल दर मिळत होता. या विरोधात आंदोलन छेडले जाईल असा इशारा महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

## पाहिजेत

**कार्यालयीन/ऑफीस कामकाजाकरिता मराठी, इंग्रजी टंकलेखक तसेच संगणकाचे Tally,Execl, Word चे ज्ञान असलेले मुलगा/मुलगी कामकाजाकरिता तात्काळ पाहिजेत.**

**: संपर्क :**

**ॲड.विलास डी.झाल्टे/ ॲड.सिध्दांत व्ही.झाल्टे**
पत्ता: १५,१६ दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, स्टेशन रोड, धुळे.
**मो:९१५६२६९९९९ भेटण्याची वेळ : १२ ते ६ पर्यंत**

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र





शुक्रवार, दि. २५ ऑगस्ट २०२३

# राजर्षी शाहू महाराज विचार जागर स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



















नाशिक । इलाईट सर्टिफिकेशन्स ॲण्ड इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स संस्थेंच्या वतीने नुकतीच राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार जागर स्पर्धा परिक्षा घेण्यात येऊन निकाल जाहीर करण्यात आले. या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना काल राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते पारितोषिकाचे वितरण करून गौरविण्यात आले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्षाचे औचित्य साधून इलाईट सर्टिफिकेशन्स ॲण्ड इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स संस्थेंच्या वतीने राजर्षी शाहू महाराज विचार जागर स्पर्धा परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत इयत्ता ७ वी ते इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत लखमापूर दिंडोरी येथील वंशिका अनिल सोनवणे हिने प्रथम १ लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले. तसेच ५० हजारांचे द्वितीय पारितोषिक चिखलओहळ मालेगाव येथील कोमल रतन त्रिभुवन, १० हजारांचे तृतीय पारितोषिक दिंडोरी येथील तर सोनल संजय दरोडे, मालेगाव येथील अपूर्व आनंद बुरड व नाशिकरोड येथील अनुराग राजेंद्र पांडे याने पटकाविले.

या सर्व पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांना भुजबळ फार्म नाशिक येथील कार्यालयात मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना मंत्री छगन भुजबळ यांनी भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे आबासाहेब थोरात, स्वप्ना थोरात यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

CMYK


दैनिक लक्ष महाराष्ट्र





# प्रसिद्ध चित्रकार राजा रवी वर्मा यांनी रेखाटलेल्या चित्रांचे प्रदर्शन




















नाशिक । प्रसिद्ध चित्रकार राजा रवी वर्मा यांनी रेखाटलेली अनेक चित्रे अजरामर झाली आहेत. विशेष करून भारतीय देवी देवता, हिंदू महाकाव्ये आणि पुराणांतील कथा यावर रवि वर्मा यांनी काढलेली चित्रे प्रमाण मानली जातात. त्यामुळे अनेकदा आपण पाहात असलेले आणि आवडलेले चित्र हे रवि वर्मा यांनी रेखाटलेले आहे हे माहित नसते. ही गोष्ट लक्षात घेऊन राजा रवी वर्मा यांनी रेखाटलेली चित्रे पाहण्याची संधी नाशिककरांना मिळाली आहे. विशेष म्हणजे यामध्ये १८९४ मध्ये शिकागो येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाला पाठवलेल्या आणि प्रसिद्ध असलेल्या चित्रांचा यात समावेश आहे. शहरातील इंडेक्स आर्ट गॅलरी, पहिला मजला, पंचगंगा अपार्टमेंट, निलेश सुपर मार्केटच्या मागे, तिडके कॉलनी, नाशिक येथे सदर चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. हे प्रदर्शन इंडेक्सआर्ट गॅलरीचे रुचिर पंचाक्षरी यांनी भरविले आहे. प्रदर्शन सर्वांसाठी खुले आणि निशुल्क स्वरूपाचे आहे. प्रदर्शन येत्या ६ सप्टेंबरपर्यत सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यत पाहता येणार आहे.या प्रदर्शनाबाबत माहिती देतांना प्रदर्शनाच्या कला प्रबंधक प्राध्यापिका, चित्रकार स्नेहल तांबुळवाडीकर - खेडकर सांगतात की, हे प्रदर्शन वर्मा यांच्या कलेतील स्त्रीयांकडे पाहण्याचा विचार अधोरेखीत करते. कारण त्यांना आधुनिक जगासाठी भारतीय स्त्री ची प्रतिमा निर्माण करण्याचे श्रेय दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रदर्शनाविषयी अधिक माहिती देतांना पंचाक्षरी सांगतात की, नाशिककरांना राजा रविवर्मा यांची संपूर्ण माहिती मिळावी यासाठी त्यांनी रेखाटलेल्या चित्रांची वेगवेगळी विभागणी करण्यात आली असून आधी एक प्रदर्शन संपन्न झाले आहे. येत्या काळात अशाच प्रकारच्या आणखीन २ प्रदर्शनाचे आयोजन केले जाणार आहे.